रे.दि.मु. ५४९/२०२३

कदम वि. कदम

**CNR**. **No.MHSO**070006702023

<u>निशाणी क्र. १९ वरील आदेश</u>

(पारित दि. १४.०८.२०२६)

प्रस्तुतचा अर्जदार/प्रतिदाव्यातील वादी म्हणजेच मुळ प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिदाव्यातील प्रतिवादी म्हणजेच मुळ वादींविरुध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश पारित होऊन मिळणेसाठी दाखल केले आहे.

**<u>अर्जाचे संक्षिप्त टाचण असे की,</u> :-**

२. अर्जदार यांनी प्रस्तुतचा प्रतिदावा मुळ वादीविरुद्ध निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. मौजे मगरवाडी, ता. पंढरपुर, जि. सोलापुर येथील गट क्र.४३०/२ क्षेत्र ०.३हे. ०९आर ही प्रतिदावा मिळकत आहे. सदरची मिळकत ही पुर्व-पश्चिम चालीची असुन तिच्या उत्तर बाजुस मुळ वादी यांची जमीन आहे.

३. अर्जदार व मुळ वादी क्र.१ यांचे वडिलार्जित गट क्र.४३० ही होती. १९९३ साली मुळ वादी क्र.१ हा अज्ञात असताना कौटुंबिक व्यवस्थेसाठी त्या मिळकतीचे कागदोपत्री वाटपपत्र होऊन फेरफार नोंद क्र.३५५ ने प्रमाणित झाली. परंतु, वादी, प्रतिवादी व त्यांचे आई-वडील एकत्र राहत होते. अर्जदार व मुळ वादी क्र.१ चे वडील रामकृष्ण यांनी सन २००० मध्ये त्यांचे तारापुर येथील गट क्र.२०२ मिळकतीवर बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा सुस्ते यांचे गट क्र.४३० मध्ये घर बांधण्याकरीता रक्कम रु.२,००,०००/- (रक्कम रुपये दोन लाख फक्त) कर्ज काढले. सदर बांधलेल्या घरामध्ये मुळ वादी क्र.१, प्रतिवादी व त्यांचे आई-वडील एकत्र राहु

लागले. सन २००४ पर्यंत एकत्र राहुन उत्पन्न घेऊन कुटुंबांची उपजिवीका करीत आले होते.

**४.** सन २००४ मध्ये सन १९९३ चे वाटपाप्रमाणे प्रत्यक्षात जमिनीचे अर्जदार, मुळ वादी क्र.१, त्यांचे वडील व भावकीतील, गावातील प्रतिष्ठित व्यक्तिंनी मोजमाप करुन अर्जदारास दक्षिण–उत्तर जाणारे कॅनॉलच्या पलिकडे पश्चिमेकडील तुंगत, मगरवाडी शिवपर्यंतचे क्षेत्र मोजुन दिले व त्याचवेळी पुर्व–पश्चिम असणारे जमिनीमध्ये पुर्व–पश्चिम असा बांध पश्चिमेकडे कॅनॉल फाटा नं.४२ पर्यंत घातले व सदर क्षेत्राचे पश्चिमेस असणारे कॅनॉलचे पश्चिमेकडील संपुर्ण क्षेत्र ००.हे ६०आर (तुंगत मगरवाडी शिवेपर्यंत) अर्जदाराच्या जमिनीच्या पश्चिमेस सलग असल्यामुळे वादीस देण्यात आली व मुळ वादी क्र.१ यास उत्तर बाजुची ३हे. ९आर क्षेत्र पश्चिमेस असणा–या कॅनॉल वितरिका क्र.४२ पर्यंत दिले. तेव्हापासुन वादी, प्रतिवादी आपआपल्या क्षेत्राचे कायदेशीर मालक, कब्जे वहिवाटदार झाले आहेत व तशा नोंदी गावचे ७/१२ पत्रकी प्रमाणित झाले आहे.

**५.** अर्जदार प्रतिदावा मिळकतीमध्ये कुटुंबासह राहणेस असुन स्वतः व बटईने देऊन सदर मिळकतीची मेहनत, मशागत करीत आहे. प्रतिदावा मिळकतीमधील विहिर व बोअरमधील १/२ हिस्सा अर्जदार यांचे कडुन रक्कम रु. १,४०,०००/– मुळ वादी क्र.१ ने घेऊन तो हिस्सा सोडुन दिला व तसा नोटरी दस्त दि.२४.०६.२०१३ रोजी नोंदवुन दिला. त्यामुळे प्रतिदावा मिळकतीशी मुळ वादी यांचा काडीमात्र हितसंबंध नाही. प्रतिदावा मिळकतीमध्ये कोणत्याही बाजुस मुळ वादी यांची कब्जे वहिवाट नव्हती व नाही. त्यामुळे उजनी कॅनॉलच्या पश्चिमेकडील

३० गुंठे क्षेत्रास अर्जदाराच्या विहीरीतील पाणी गट क्र.४३०/१ सामाईक पाईपलाईन पाणी घेऊन पिके घेत वगैरे प्रश्नच निर्माण होत नाही.

६. प्रतिदावा कलम १ मध्ये नमुद मिळकती अर्जदार यांचे कायदेशीर मालकी कब्जे वहिवाटीत असल्याने त्यांनी सन २००४ मध्ये कॅनॉलच्या पश्चिमेकडील ६०आर क्षेत्रामध्ये विहिरीवरुन पाईपलाईन केली आहे. वाटपाने आलेल्या प्रतिदावा मिळकतीच्या क्षेत्रापैकी कॅनॉल वितरिका क्र.४२ चे पश्चिमेकडील ६०आर क्षेत्र कर्ण भारत शेळके रा. सुस्ते यास निम्म्या वाटपाने लेखी कराराद्वारे सन २०१८ पर्यंत दिले होते. त्यामध्ये त्यांनी डाळिंबाचे पिक जोपासलेले आहे. अर्जदार यांनी मुळ वादीविरुद्ध पोलिस ठाण्यामध्ये फिर्याद दिल्याचा राग मनात धरुन मुळ वादींनी खोडसाळपणा सुड बुद्धीने अर्जदाराच्या ६०आर क्षेत्रामध्ये जोपासलेले पिकास नोव्हेंबर २०२३ मध्ये पाणी देऊ न देणे, कसणेस व मशागतीस हरकत अडथळा केल्यामुळे अर्जदार यांनी मुळ वादींविरुध्द पंढरपुर तालुका पोलिस ठाण्यामध्ये दि.०१.११.२०२३ रोजी एन.सी.आर.क्र.१३१४/२०२३ अन्वये तक्रार दिली. त्याचा राग मनामध्ये धरुन डिसेंबर २०२३ च्या पहिल्या आठवडयात अर्जदाराच्या प्रतिदावा मिळकतीवरील वहिवाटीस मुळ वादीने हरकत अडथळा केला. अर्जदारांनी समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यास मुळ वादीने धमकी देऊन दमदाटी केली व अर्जदाराच्या वहिवाटीस हरकत अडथळा करुन कब्जा घालण्याचा प्रयत्न करु पाहु लागले. त्यामुळे मुळ प्रतिवादीस/अर्जदारास प्रतिदावा करणे भाग पडले.

७. प्रस्तुत दाव्याचे कामी वादीस निश्चित यशाची खात्री आहे. न्यायाचा तराजु हा प्रतिदाव्यातील वादीचे बाजुने आहे परंतु, सदरचा दावा गुणावगुणावर चालुन दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होणेस बराचसा कालावधी लागणार आहे. दरम्यानचे

कालावधीत यातील मुळ वादी हे अर्जदाराच्या मालकीच्या प्रतिदावा मिळकतीमध्ये असणा–या शांततामय कब्जे वहिवाटीस, पिके घेणेस, मेहनत, मशागत करणेस हरकत, अडथळा जोरदारपणे प्रतिदावा मिळकतीत कब्जा घालतील, डाळिंबाचे पिकांना पाणी देणेस, मशागत करणेस अडथळा करुन डाळिंबाचे बागेचे नुकसान करुन प्रतिदावा मिळकतीस कमीपणा आणतील अशी प्रतिदाव्यातील वादीस साधार भिती वाटत आहे. प्रतिवादीने तसे केल्यास मुळ दाव्याचा हेतुच नष्ट होणार आहे. म्हणुन प्रतिदाव्यातील वादीस प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल करणे भाग पडत आहे. प्रतिदाव्यातील प्रतिवादीविरुद्ध तुर्तातुर्त ताकीद दिल्यास प्रतिदाव्यातील प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नसुन प्रतिदाव्यातील प्रतिवादीस तुर्तातुर्त ताकीद न दिलेस प्रतिदाव्यातील वादीचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान संभवत आहे. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करुन प्रतिदावा मिळकतीमध्ये त्याच्या असणा–या शांततामय कब्जे वहिवाटीस, मेहनत मशागत करणेस मुळ वादी यांनी कोणत्याही प्रकारचा अडथळा, गैरकृत्ये करु नयेत म्हणुन तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती केली.

८. नि.क्र.२१ अन्वये मुळ वादीतर्फे प्रतिदाव्यास कैफियत व प्रस्तुतचे अर्जास म्हणणे एकत्रितरित्या दाखल असुन त्याद्वारे त्यांनी अर्जातील मजकुर खटा व लबाडीचा असुन पुढे असे कथन केले आहे की, मौजे मगरवाडी येथील गट क्र.४३० चे सन १९९३ मध्ये वाटप होऊन त्यामध्ये असणा–या विहिरीमध्ये अर्जदार व मुळ वादी क्र.१ यांना १/२ हिस्सा देण्यात आला व ती अर्जदाराच्या हिस्स्यामध्ये गेली. अर्जदार व मुळ वादी क्र.१ यांच्यामध्ये लाईट बिल व पाण्याच्या पाळीवरुन खटके उडु लागल्याने मुळ वादी क्र.१ यांनी विहिरीतील पाणी घेण्याचा हक्क अर्जदारास रक्कम रु. १,४०,०००/– चे मोबदल्यात सोडुन दिला व त्या रकमेतुन स्वतःचे गट

क्र.४३०/१ मध्ये १० ते १२ वर्षांपुर्वी विहीर पाडुन स्वतःचे क्षेत्र बागायत केले. तरीही, मुळ वादी क्र.१ अर्जदाराच्या विहीरीवरुन सामाईक पाईपलाईनने पाणी घेऊन उजनी कॅनॉलच्या पश्चिमेकडील त्याच्या हिस्स्याचे ३० गुंठे क्षेत्रात बागायती पिके घेत होता व आहे.

९. गट क्र.४३० ही अर्जदार व मुळ वादी क्र.१ यांची वडिलार्जित मिळकत असुन सन १९९३ साली वाटप होऊन दक्षिणेकडील ३हे. ९आर अर्जदाराचे हिस्स्यात तर उत्तरेकडील ३हे. ९आर मुळ वादी क्र.१ चे हिस्स्यात देण्यात आले. त्या अनुषंगाने गट क्र.४३०/१ मुळ वादी क्र.१ च्या नावे तर गट क्र.४३०/२ अर्जदाराच्या नावे नोंदण्यात आले. गट क्र.४३०/१ चे मुळ वादी क्र.१ व २ यांच्यामध्ये दि.१८.०९.२०१३ रोजी वाटप झाले आहे. गट क्र.४३०/१ च्या दक्षिणेस अर्जदार यांची गट क्र.४३०/२ ही पुर्व–पश्चिम पट्टी आहे. अर्जदार यांनी उजनी कॅनॉलच्या पश्चिमेकडील सर्व ६०आर क्षेत्र विक्रीस काढले आहे. परंतु, ते क्षेत्र अर्जदार व मुळ वादी क्र.१ यांच्या मालकीचे आहे. त्यापैकी उत्तरेकडील ३०आर क्षेत्र मुळ वादी क्र.१ च्या मालकी वहिवाटीचे आहे, त्यामध्ये त्यांचे डाळिंबाचे पिक आहे त्यास प्रस्तुत अर्जदाराने मेहनत मशागत करण्यास, वहिवाट करण्यास हरकत अडथळा करत आहे. दि.१५.१०.२०२३ रोजी डाळिंबाच्या पिकात औषध फवारणी करत असताना, अर्जदार यांनी मुळ वादी क्र.१ यास हरकत अडथळा केला. त्यामुळे मुळ वादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केला असुन त्याला काल्पनिक व रचनात्मक कथन करुन प्रतिदावा व प्रस्तुतचा अर्ज सदर अर्जदाराने केला आहे. सबब, तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती मुळ वादी क्र.१ यांनी केली आहे.

**१०.** अर्जकथने, म्हणणे व दाखल कागदपत्रे पाहता पुढील मुद्दे न्यायालयाच्या निष्कर्षाकामी उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष सुसंगत कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी यश आहे काय? | होय. |
| २. | अनुकुलतेचा तराजू वादीच्या बाजूने आहे काय? | होय. |
| ३. | अर्ज नामंजूर झाल्यास अपिरिमीत, भरपाई न होण्यासारखे नुकसान वादीस होऊ शकते का? | होय. |
| ४. | समर्पक आदेश कोणता. | अर्ज मंजूर करण्यात येतो |

## <u>कारणमीमांसा</u>

**११.** उपरोक्त मुद्दे क्र. १ ते ४ हे एकमेकांवर विसंबून असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रितरित्या विविचेनार्थ घेण्यात येत आहेत.

**१२.** तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज निर्णय करताना प्रथमदर्शनी बाजू कोणाच्या बाजूने आहे व अर्ज नामंजूर झाल्यास अपरिमित नुकसान कोणाचे होणार आहे हे ऐवढेच पाहणे गरजेचे असते. याकरिता सखोल पुराव्यात जाण्याची गरज नसते.

तुर्तातुर्त ताकीदींचा आदेश मिळण्याकरिता संबंधीत अर्जदाराने आपल्या मागणीमध्ये कायदयाचे समन्याय (Equity) हे तत्व दर्शवून देणे गरजेचे असते.

**१३.** उभयपक्षातर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जातील कथनांचे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, अर्जदार/मुळ प्रतिवादीने प्रस्तुतचा प्रतिदावा हा प्रतिदावा मिळकतीचे अनुषंगाने मुळ वादींविरुद्ध निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. अर्जदाराचे कथनानुसार, मौजे मगरवाडी, ता.पंढरपुर, जि. सोलापुर येथील शेत जमीन गट क्र.४३०/२ ही जमीन प्रतिदावा मिळकत आहे, मौजे मगरवाडी येथील मुळ गट क्र.४३० याचे १९९३ साली मुळ वादी क्र. १ व अर्जदार यांचेमध्ये वाटप होऊन दोघांना प्रत्येकी ३हे. ९आर इतके क्षेत्र वाटुन आले. गट क्र.४३०/१ हा मुळ वादी क्र.१ यास तर गट क्र.४३०/२ हा अर्जदार याचे नावे नोंदला गेला. वाटपाने आलेल्या क्षेत्रावर मुळ वादी क्र. १ व त्यांची शांततामय कब्जे वहिवाट असुन अर्जदाराचे वहिवाटीस मुळ वादी क्र. १ यांनी दमदाटी करुन दावा मिळकत वहिवाटण्यासाठी वादीला हरकत अडथळा केला.

**१४.** प्रस्तुतचा अर्ज निर्णयित करतेवेळी अर्जदाराने दावा मिळकतीवर त्याची प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे हे दाखवुन देणे गरजेचे आहे. दावा मिळकतीवर अर्जदाराची शांततापुर्ण कब्जे वहिवाट असणाच्या कथनास पुष्टी देण्याकरीता अर्जदाराने नि.क्र.३४/१ लगत मौजे मगरवाडी, ता. पंढरपुर, जि. सोलापुर येथील गट क्र.४३०/२ चा वर्ष २०२१ ते २०२४ चा ७/१२ उतारा तसेच, चालु वर्षाचा पिकपाणी उतारा, फेरफार क्र.३५५ चा उतारा, अर्जदार यांचे प्रतिदावा मिळकतीमधील वादळी वारे व अवकाळी पर्जन्य वृष्टी नुकसान भरपाईचा डाळिंब पिकाच्या पंचनाम्याची सही शिक्याची प्रत तसेच, नुकसान भरपाईचे पैसे मिळाल्याची

तहसिलदार येथील सही शिक्याची प्रत, सदरचे पैसे बँक खात्यावर जमा झाल्याचे खाते उतारा, उजनी डावा कालवा वितरीका क्र.४२ – साखळी क्र.१/१५० वरुन पाईपलाईन ओलांडुन नेण्यासाठी परवानगीची प्रत, वादी–प्रतिवादी यांचे राहते घराबाबतचे वाटणी पत्र, श्री. कर्णे यांना दिलेला बटई पत्र करारनामा, मौजे तारापुर येथील गट क्र.२०२ मधील फेरफार नोंद क्र.३०७१ सही शिक्याची प्रत, मौजे तारापुर येथील गट क्र.२०२ चा ७/१२ उतारा, प्रतिदावा मिळकतीवर असणा–या पिक नोंदीची चौकशी होऊन मिळणेबाबचा अर्ज, बळीराजा कृषी केंद्र यांचे कडील पावती नं.२१९६ तसेच इतर पावत्या व पिक नोंदीची चौकशी होऊन मिळणेबाबत पत्र, मंडल अधिकारी यांचेकडे दिलेले जाबजबाबाची सत्यप्रत, दावा व प्रतिदावा मिळकतीच्या गटाचा पंचनामा, मुळ वादी क्र.१ ने अर्जदारांच्या जमिनीत केलेल्या पाईपलाईनच्या तोडफोडीचे छायाचित्र, अर्जदार यांनी मुळ वादी क्र.१ विरुद्ध दाखल केलेली एन.सी.आर.क्र.१३१४/२०२३ रोजीची सही शिक्याची प्रत तसेच, त्यांचे तर्फे साक्षीदार क्र.१ ते ४ यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**१५.** अर्जदारतर्फे दाखल कागदपत्रे तसेच, दावा व प्रतिदावा मिळकतींचे ७/१२ उतारे पाहिले असता, दावा मिळकत म्हणजेच गट क्र.४३०/१ या मिळकतीस वादी क्र.१ व २ यांच्या नावची नोंद असल्याचे तर प्रतिदावा मिळकत म्हणजेच गट क्र.४३०/२ या मिळकतीस अर्जदार/प्रतिदाव्यातील वादी यांच्या नावची नोंद असल्याचे निदर्शनास येते. फेरफार क्र.३५५ चे अवलोकन केले असता, दि.०९.०३.१९९३ रोजी धोंडुबाई यांनी आपली मुले म्हणजेच वादी क्र.१ व प्रतिवादी/अर्जदार यांना गट क्र.४३० हा त्यांच्या वहिवाटीप्रमाणे मुळ वादी क्र.१ यास उत्तर दिशेकडील ३हे. ९आर क्षेत्र तर प्रतिवादीस/अर्जदारास दक्षिणेकडील ३हे. ९आर क्षेत्र असे वाटप करुन दिले. सदरच्या फेरफाराचे काळजीपुर्वक अवलोकन केले

असता, गट क्र.४३० मधील कोणताही हिस्सा मुळ वादी क्र.१ व प्रतिवादी/अर्जदार यांचेमध्ये सामाईक अथवा वाटप न होता उर्वरित ठेवल्याचे दिसुन येत नाही. पुढे फेरफार क्र.२०७४ चे अवलोकन केले असता, मुळ वादी क्र.१ याने त्याच्या हिस्स्यास वाटपाने आलेल्या क्षेत्रापैकी १हे. ४९आर इतके क्षेत्र मुळ वादी क्र.२ यास वाटपाने दिल्याचे निदर्शनास येते. वादीतर्फे दाखल नकाशाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये देखील त्यांचेमध्ये वाटप झाल्याचे अथवा वाटपादरम्यान कोणते क्षेत्र सामाईक ठेवले असल्याचा बोध होत नाही.

**१६.** प्रतिदाव्यातील वादपत्राचे तसेच, मुळ वादीतर्फे कैफियत व म्हणण्याचे अवलोकन केले असता, मुळ वादी क्र.१ व प्रतिवादी/अर्जदार यांच्यामधील नाते तसेच, वाटप झालेबाबत कोणताही वाद नाही. फेरफार क्र.३५५ चे अवलोकन केले असता, गट क्र.४३० चे मुळ वादी क्र.१ व प्रतिवादी यांच्यामध्ये संपुर्ण क्षेत्राचे वाटप झाल्याचे निदर्शनास येते. सदरच्या फेरफारामध्ये सामाईक क्षेत्र असलेबाबत कोणताही मजकुर नमुद नाही. मुळ वादी तसेच, प्रतिवादी/अर्जदार यांच्या वादपत्रातील कथनाप्रमाणे वाटपावेळी गट क्र.४३० मध्ये असणारी विहीर प्रतिवादीच्या हिस्स्यास गेली व सदरच्या विहिर, पाईपलाईन, इलेक्ट्रीक मोटारीमध्ये मुळ वादी क्र.१ यास १/२ हिस्सा देण्यात आला. परंतु, त्यांच्यामध्ये सततच्या उडणा-या खटक्यांमुळे मुळ वादी क्र.१ ने सदर विहिरीवरील त्याचा हिस्सा रक्कम रु.१,४०,०००/- (रक्कम रुपये एक लाख चाळीस हजार फक्त) चे मोबदल्यात प्रतिवादी/ अर्जदाराचे लाभात सोडुन दिला व स्वत:च्या दावा जमिनीत विहिर पाडुन क्षेत्र बागायत करु लागला. सदरच्या मजकुरावरुन मुळ वादी क्र.१ व प्रतिवादी/अर्जदार यांचेमध्ये गट क्र.४३० चे सम प्रमाणात संपुर्णत: वाटप झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे मुळ वादी कथन करीत असल्याप्रमाणे मुळ वादी क्र.१ व प्रतिवादी/अर्जदार यांचेमध्ये कोणतेही क्षेत्र सामाईक

असलेबाबत, उजनी कॅनॉलच्या पश्चिमेकडील क्षेत्र मुळ वादी क्र.१ व प्रतिवादी/अर्जदार यांचे दोघांचे मालकीचे असलेबाबत व त्यावर वादीची शांततापुर्ण कब्जे वहिवाट असलेबाबत साशंकता निर्माण होते.

१७. अर्जदार यांनी प्रतिदावा मिळकतीवर त्यांची शांततापुर्ण कब्जे वहिवाट आहे हे दाखवण्याबाबत अनुक्रमे नि.क्र.३५ ते ३७ लगत साक्षीदार केशव माधव कदम, सागर विठ्ठल जाधव व कर्ण भारत शेळके यांची प्रतिज्ञापत्रे दाखल केले असुन सदर प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले असता, त्यामध्ये त्यांनी प्रतिदावा मिळकत ही प्रस्तुत अर्जदारांची असल्याचे व त्यापैकी ६०आर क्षेत्र सन २००४ ते २०१८ पर्यंत कर्ण भारत शेळके यांना बटईने करण्यास दिले असल्याचे व सन २०१८ ते सन २०३० साठी एकनाथ कर्ण शेळके यांना अर्जदाराच्या मुलाच्या एम.बी.बी.एस. शिक्षणासाठी बटईने दिले असल्याचे व उर्वरित क्षेत्रात अर्जदाराचेच कब्जे वहिवाट असल्याचे कथन केले आहे. नि.क्र.३८ लगत एकनाथ कर्ण शेळके यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन त्यांनी देखील प्रतिदावा मिळकतीपैकी ६०आर क्षेत्र अर्जदाराने सन २०२५ पर्यंत त्यांच्याकडे कसण्यासाठी दिले असल्याचे कथन केले आहे.

१८. अर्जदार/प्रतिदाव्यातील वादीतर्फे दाखल असलेली कागदपत्रे विचारात घेता त्यांचेतर्फे दाखल साक्षीदारांच्या प्रतिज्ञापत्रातील मजकुरास पुष्टी देण्याकरीता त्यांनी कर्ण भारत शेळके व एकनाथ कर्ण शेळके यांना प्रतिदावा मिळकतीतील ६०आर क्षेत्राचे लिहुन दिलेल्या बटईपत्र करारनाम्याच्या छायांकित प्रती दाखल केल्या असुन, सदर प्रतींचे अवलोकन करता त्यामध्ये तथ्य असल्याचे निदर्शनास येते. अर्जदार तर्फे नि.क्र.३४ लगत दाखल इतर कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रतिदावा मिळकतीवर सदर अर्जदार यांची कब्जे वहिवाट असल्याचे स्पष्ट होते.

**१९.** मुळ वादींतर्फे नि.क्र. ४/५ लगत दाखल असलेल्या दैनिक सकाळ या वृत्तपत्राच्या अंकाचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार न करणेबाबत सावधानतेची जाहीर नोटीस दिल्याचे दिसुन येते. सदरच्या अंकावरुन तसेच, अर्जदार तर्फे नि.क्र.३४/३४ लगत दाखल असलेल्या एन.सी.आर.क्र.१३१४/२०२३ चे अवलोकन करता, मुळ वादी क्र.१ हा सदर अर्जदार/ प्रतिदाव्यातील वादी यांच्या प्रतिदावा मिळकतीवर असलेल्या शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत असल्याचे दिसुन येते.

**२०.** प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे कथन व दाखल कागदपत्र लक्षात घेता, कागदपत्रे त्याचे कथनास पुष्टी देत आहेत. परिणामतः सकृत दर्शनी प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे कथनात सत्यता दिसून येत आहे. मुळ दाव्यातील वादी यांनी प्रतिदावा मिळकतीमधील अर्जदाराचे/प्रतिदाव्यातील वादी यांच्या असणा-या शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केल्यास त्यांचे प्रतिदावा मिळकतीत असणारे हक्क व हितसंबंध धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे आपल्या कथनामध्ये तुलनात्मकदृष्टया अनुकलता दर्शवून दिलेली आहे. साहजिकताच मुळ वादींविरुध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश मागण्यास ते हक्कदार आहेत असे दिसून येते. तुर्तातुर्त आदेश पारित न केल्यास प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. मात्र, मनाई आदेश दिल्याने मुळ वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वरील सर्व परिस्थितीवरुन अनुकुलतेचा तराजू प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे बाजूने झुकत आहे. उभयपक्षांमध्ये योग्य तो न्यायनिर्णय होण्याकरिता तसेच प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे अपरिमित नुकसान टाळण्याकरिता मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष प्रतिदाव्यातील वादी/अर्जदाराचे बाजूने

लावून मुद्दा क्र. ४ चे निष्कर्षासाठी व अर्ज निर्णयाकामी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी म्हणजेच मुळ वादी यांनी स्वतः किंवा त्यांच्या वतीने इतर कोणतेही नातेवाईक, दलाल, नोकरचाकर, एजंट इ. यांना सदर दाव्याचा अंतीम निर्णय होईपर्यंत प्रतिदावा मिळकती संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा हरकत अडथळा करण्यास या तात्पुरत्या मनाई हुकूमाव्दारे प्रतिबंधित केले आहे.

**(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)**

GHORPADE PRIYA BALASAHEB
Digitally signed by GHORPADE PRIYA BALASAHEB
Date: 2026.08.14 16:03:27 +0530

**दि.१४.०८.२०२६** **(श्रीमती पी.बी.घोरपडे)**

**६वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**पंढरपुर**

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.R.SORATE |
| Court | 6th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date | 14.08.2026 |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | 14.08.2026 |
| Judgment / Order uploaded on | 14.08.2026 |